(३)

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१६/प्र.क्र.६९/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १७ जून, २०१६

वाचा -

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र-२००९ /(६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२.
२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/ स्वयंअर्थ/२०१५-१६/माध्य-क(३०१)/२९८१, दिनांक ५ मे, २०१६

प्रस्तावना -

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिती, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेस दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, व विहित पध्दतीने परवानगी देणे, यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) पारित केला असून सदर अधिनियम शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अंमलात आला आहे. तसेच, सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छूक असणा-या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी नवीन शाळांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता नवीन शाळा मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरिता दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. सदर प्रस्तावांची छाननी करुन पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय-

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अन्वये सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता प्राप्त झालेल्या एकूण ५३०१ प्रस्तावांपैकी

Principal
Tilak Maharashtra Vidyalaya
Gultekdi, Pune - 411 037.

३७४३ शाळांचे प्रस्ताव पात्र ठरतात. त्यानुसार या सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या ३७४३ शाळांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून, नवीन शाळा स्थापन करणे आणि विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरीता याद्वारे शासन परवानगी देण्यात येत आहे.

२. **शासन परवानगी/शाळांचा दर्जावाढ करण्याच्या अटी व शर्ती** -

२.१ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे**.

२.२ पात्र ठरलेल्या संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने **अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

**अ)** ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

**ब)** ज्या व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल** ठरेल.

**क) सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई** इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून **परवानगी** (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस **मान्यता** (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत** (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

२.३ सोबतच्या विवरणपत्रातील यादीनुसार परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/दर्जावाढ शाळांना i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील

२.४ सदर आदेश संबंधित संस्थांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

२.५ संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची



Principal
Tilak Maharashtra Vidyalaya
Gultekdi, Pune - 411 037.

खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

२.६ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

२.७ **यु-डायस डाटा:-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"***स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा***" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता **" स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१६०६१७१७१८५०९४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=dc74b0493b4979ad0aa76763f873c23fa35ecb44970562d4aa14a832b6357e54, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2016.06.18 13:45:18 +05'30'

**( रा. ग. गुंजाळ )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
५. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
८. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
९. शिक्षण निरीक्षक(पश्चिम/उत्तर/दक्षिण) बृहन्मुंबई
१०.सर्व संबधित प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपालिका
११.निवडनस्ती (एसएम-२).

Principal
Tilak Maharashtra Vidyalaya
Gultekdi, Pune - 411 037.



5

| अ.क्र | जिल्हा | संस्थेचे नाव व पता | शाळेचे नाव व पत्ता | नवीन शाळा/ दर्जावाढ | मंडळ संलग्नता | शाळेचा प्रकार | शाळेचे माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १२४ | पुणे | टिळक महाराष्ट्र विद्यापीठ न्यासविद्यापीठ भवन , गुलटेकडी , मुकुंद नगर , पुणे ४११०३७ | टिळक महाराष्ट्र विद्यालयविद्यापीठ भवन , गुलटेकडी , मुकुंद नगर , पुणे - ४११०३७ | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक (इयत्ता १ ली. ते ५ वी.) | इंग्रजी |
| १२५ | पुणे | सुभद्राज एज्युकेशनल ट्रस्ट, महाराष्ट्र हौसींग बोर्ड, येरवडा,पुणे | एस एन बी पी इंटरन्याशनल स्कूल चिखली पुणेरिव्हर रेसिदेन्ची गट न.९० देहू आळंदी रोड चिखली पुणे ४११०६२ | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक (इयत्ता १ ली. ते ५ वी.) | इंग्रजी |
| १२६ | पुणे | दिवा फौंडेशन५६७ , कमलसुधा अपार्टमेंट . नारायण पेठ पुणे - ४११०३० | इननेन्त इंटरनेशनल स्कूल११५ /१ सुस रोड , पाषाण , गुरुनाथ मंगल दत्तधाम मंदिरच्या पुढे पुणे ४११०२१ | नवीन शाळा | आय.सी.एस.ई | प्राथमिक (इयत्ता १ ली. ते ५ वी.) | इंग्रजी |
| १२७ | पुणे | ग्रामोदया ट्रस्ट डॉ. तांबे हॉस्पिटल , इंदिरानगर , एस टी स्थानकाजवळ ,संगमनेर , जिल्हा : अहमदनगर - ४२२६०५ | द अकॅडेमी स्कूल सर्वे.नं.३१ दंगे चौकाजवळ ,रावेत रोड , ताथवडे , तालुका : मुळशी , जिल्हा : पुणे - ४११०३३ | नवीन शाळा | आय.सी.एस.ई | प्राथमिक (इयत्ता १ ली. ते ५ वी.) | इंग्रजी |
| १२८ | पुणे | श्री.समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ मोईश्री.समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ मोई , मु.मोई पो.कुरुळी ता.खेड जि.पुणे ४१०५०१ | श्री समर्थ स्कूल चीम्बली फाटा , कुरुळी , तालुका खेड जिल्हा :-पुणे . | नवीन शाळा | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी.) | मराठी |
| १२९ | पुणे | सह्याद्री शिक्षण मंडळ ताम्हिणी मु पळसे पोस्ट माले तालुका मुळशी जिल्हा पुणे ४१२१०८ | श्री विनझाईदेवी हाय स्कूल ताम्हिणी मु ताम्हिणी पोस्ट माले तालुका मळशी जिल्हा पुणे | नवीन शाळा | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी.) | मराठी |
| १३० | पुणे | ग्राम विकास संस्था महाराष्ट्र२१८३, रेव्हेन्यू कॉलनी शिरूर, ता. शिरूर, जि. पुणे | नवीन उच्च प्राथमिक शाळामु.पो.निमगाव भोगी, ता. शिरूर, जि. पुणे | नवीन शाळा | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी.) | मराठी |
| १३१ | पुणे | कै रमेशभाऊ वांजळे सेवा संस्थाघर नं अ/१५ विंग अ यश गंगा सोसायटी वडगाव बु पुणे 41 | नवीन गुरुकुल प्राथमिक विद्यालय धायरी पुणे | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते उच्च प्राथमिक (इयत्ता १ ली. ते ८ वी.) | मराठी |
| १३२ | पुणे | जय मल्हार कृषी विकास प्रतिष्टान२४०,सरदार पेठ,मारुती आली,शिरूर,तालुका शिरूर ,जिल्हा पुणे | जय मल्हार प्राथमिक व उच्च प्राथमिक विद्यालयचिंचोली मोराची ता.शिरूर जि.पुणे पिन कोड ४१२२१८ | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते उच्च प्राथमिक (इयत्ता १ ली. ते ८ वी.) | मराठी |
| १३३ | पुणे | पी जी अकादमीशॉप न १२ ते १५ मीरा क्लासिक थेरगाव संतोष मंगल कार्यालयासमोर,मकडोनाल्ड समोर , पुणे ४११०33 | पी जी इंटरनेशनल स्कूलगट नं ४४ हिंगानिगडा तालुका दौंड जिल्हा पुणे ४१२२१९ | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते उच्च प्राथमिक (इयत्ता १ ली. ते ८ वी.) | इंग्रजी |
| १३४ | पुणे | श्री शंभू महादेव देवस्थान ट्रस्टफुरसुंगी तालुका हवेली जिल्ला पुणे | शिव शंभो इंग्लिश मेडियमफुरसुंगी तालुका- हवेली, जिल्हा- पुणे | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते उच्च प्राथमिक (इयत्ता १ ली. ते ८ वी.) | इंग्रजी |
| १३५ | पुणे | कवी मोरोपंत शिक्षण संस्था बारामतीकवी मोरोपंत शिक्षण संस्था विद्या मंदिर, आमराई, मार्केट यार्ड जवळ, बारामती,जि.पुणे. | कवी मोरोपंत शिक्षण संस्थेचे इंग्लिश मिडीयम स्कूलकवी मोरोपंत शिक्षण संस्था विद्या मंदिर आमराई, मार्केट यार्ड जवळ, बारामती जि पुणे | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते उच्च प्राथमिक (इयत्ता १ ली. ते ८ वी.) | इंग्रजी |
| १३६ | पुणे | राजा श्री शिवराय प्रतिष्ठान राम बाग कॉलनी , पौंड रोड , कोथरूड पुणे ४११०३८. | राजा श्री शिवराय प्रतिष्ठान न्यू इंडिया स्कूल गट नं. १६७ , मु.पो. भूकुम , ता.मुळशी ,जि. पुणे . | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते उच्च प्राथमिक (इयत्ता १ ली. ते ८ वी.) | इंग्रजी |
| १३७ | पुणे | मदर इंडिया एज्युकेशन सोसायटी C/o. सेंट . लार्देस हाय स्कूल प्लॉट न .२६ , सेक्टर १६ /A, वाशी , नवी मुंबई - ४०० ७०३ | रयान इंटरनेशनल स्कूल ऐफेफेल सिटी टावर्स , तळेगाव चाकण रोड , चाकण , पुणे | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक ते उच्च प्राथमिक (इयत्ता १ ली. ते ८ वी.) | इंग्रजी |
| १३८ | पुणे | रिशी संस्कृती विद्या केंद्र रिट्रीट चारिटेबल ट्रस्ट१२१२/ ब-२, सीता, आपटे रोड, पुणे ४११००४ | रिशी गुरुकुलम गाव - कातरखदक तालुका - मुळशी पो - खांबोली पुणे | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक ते उच्च प्राथमिक (इयत्ता १ ली. ते ८ वी.) | इंग्रजी |
| १३९ | पुणे | ग्लोरी एज्युकेशन सोसायटीस.नं.नं १ /१ लक्ष्मी नगर गल्ली ८ पिंपळे गुरव पुणे ४११०६१ | ग्लोरी इंग्लिश मेडियम स्कूलहिंजवडी जांबे रस्ता पुणे | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते माध्यमिक (इयत्ता १ ली. ते १० वी.) | इंग्रजी |
| १४० | पुणे | युनिवर्सल एज्यूकेशनल ट्रस्ट३१६, वैदूवाडी , हडपसर , पुणे - 13 | न्यू एन्जेल्स स्कूलगट न. ७८६, खडके वस्ती, अप्पर डेपो समोर, पुणे | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते माध्यमिक (इयत्ता १ ली. ते १० वी.) | इंग्रजी |
| १४१ | पुणे | दत्तारेखा चारिटेबल ट्रस्ट मु/पो . सार्थक रेसिडनसी स.न.२७,प्लॉट न A /१८ नांदेड फाटा सिंहगड रोड पुणे ४११०४१ | शाईन एंजल्स इंग्लिश मेडियम स्कूल गट न ९०७ नांदेड फाटा , आंबी तालुका हवेली जिल्हा पुणे | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते माध्यमिक (इयत्ता १ ली. ते १० वी.) | इंग्रजी |
| १४२ | पुणे | श्री संत तुकाराम महाराज शिक्षण संस्था रहाटणीश्रीनगर, नखाते वस्ती , रहाटणी पुणे -१७. | भिकोबा तांबे इंग्लिश स्कूलमुक्काम पोस्ट - शिवे , तालुका - खेड, जिल्हा - पुणे | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते माध्यमिक (इयत्ता १ ली. ते १० वी.) | इंग्रजी |



Principal
Tilak Maharashtra Vidyalaya

3

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
Email ID:- sm२.sesd-mh@gov.in

दूरध्वनी क्र:-

क्रमांक:-एसएफएस-१०२१/प्र.क्र.५५१/एसएम-२

दिनांक:- १४ ऑक्टोबर, २०२१

# इरादा पत्र

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,
पुणे.

विषय- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी इरादापत्र...

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे संचलित टिळक महाराष्ट्र विद्यालय, मुकुंदनगर, गुलटेकडी, पुणे.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून टिळक महाराष्ट्र विद्यालय, मुकुंदनगर, गुलटेकडी, पुणे या शाळेचा (प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. ६ वी ते १२ वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई., सर्व शाखा) स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर दर्जावाढ करण्याकरिता अर्ज सादर केला होता.

२. वर नमुद केलेल्या विषयावरील आपल्या अर्जाच्या संदर्भात, आपणांस असे कळविण्यात येत आहे की, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून राज्यमंडळ संलग्नता असलेली टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे संचलित टिळक महाराष्ट्र विद्यालय, मुकुंदनगर, गुलटेकडी, पुणे या शाळेचा (प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. ६ वी ते १२ वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई., सर्व शाखा) स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर दर्जावाढ करण्याकरिता शाळेचे काम सुरु करण्यास पुढील अटीं व शर्तीसह इरादा पत्र देण्यात येत आहे.

३. अटी व शर्ती :-

(एक) सदर इरादा पत्र, अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे अनुपालन केल्याशिवाय, मान्यता पत्राची हमी देत नाही.

(दोन) सदर इरादा पत्राच्या आधारे, नोंदणीकृत संस्था किंवा न्यास किंवा कंपनीला शाळा / दर्जावाढीचे वर्ग सुरू करता येणार नाही.

(तीन) सदर इरादा पत्राचा, सी.बी.एस.ई. / आय.सी.एस.ई. / आय.जी.सी.एस.ई. / आय.बी., इत्यादी मंडळांच्या संलग्नतेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र म्हणून वापर करता येणार नाही.

Principal
Tilak Maharashtra Vidyalaya
Gultekdi, Pune - 411 037.

(चार) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ आणि अधिनियमान्वये व नियमांन्वये शासनाने वेळोवेळी दिलेले निदेश, यांमध्ये विहीत केल्याप्रमाणे, इरादा पत्र प्राप्त झाल्यापासून १८ महिन्यांच्या आत, पायाभूत व भौतिक सुविधा (वर्गखोल्या, प्रसाधनगृहे, पेयजल सुविधा, प्राचार्य व कर्मचारी वर्ग कक्ष, ग्रंथालय, प्रयोगशाळा, इत्यादींसारख्या) याबाबतची मानके, अटी व शर्ती यांचे अनुपालन करणे अनिवार्य असेल.

(पाच) वर नमूद केलेल्या सुविधांचे अनुपालन केल्यानंतर, इरादा पत्र प्राप्त झाल्यापासून १८ महिन्यांच्या आत, संबंधित जिल्ह्याच्या क्षेत्र स्तरीय प्राधिकरणाकडे मान्यता पत्रासाठी अर्ज सादर करणे, ही संस्थेची किंवा न्यासाची किंवा कंपनीची जबाबदारी असेल.

(सहा) जर १८ महिन्यांच्या आत, मान्यता पत्रासाठी अर्ज सादर करण्यात शाळा व्यवस्थापन अपयशी ठरत असेल तर, इरादा पत्र रद्द होईल. इरादा पत्राचा कालावधी, कोणत्याही परिस्थितीत वाढविला जाऊ शकणार नाही.

(सात) इरादा पत्र दिल्यानंतर, प्रस्तावित शाळेचे ठिकाण बदलता येणार नाही. जर व्यवस्थापनाने, शासनाने मंजूर केलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणच्या मान्यता पत्रासाठी अर्ज केला असेल तर, इरादा पत्र रद्द होईल.

(आठ) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तीचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरून, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले इरादा पत्र रद्द करू शकेल.

(नऊ) सदर संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने अधिनियमाच्या " अनुसूची ग " मध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम व्यवस्थापन आणि संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या नावे संयुक्तरित्या, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राच्या स्वरूपात किंवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेतील मुदत ठेवीच्या स्वरूपात ठेवणे आवश्यक राहील.

(दहा) सदर संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्राकरिता अर्ज करताना अद्ययावत आरटीई नमुना-२ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(इ.मु. काझी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी -
आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
विभागीय शिक्षण उप संचालक, पुणे विभाग, पुणे.
शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे
निवड नस्ती एसएम-२/(प्र.क्र.५५१/२०२१).

Principal
Tilak Maharashtra Vidyalaya
Gultekdi, Pune - 411 037.